महाराष्ट्र टाइम्स, मुंबई २८ फेब्रुवारी २००८



**गौरव उद्योजकतेचा...** ब्रिटनमध्ये उद्योगांसाठीचा सर्वोच्च पुरस्कार म्हणजे राणी एलिझाबेथ यांच्यातर्फे दिला जाणारा एसएसपी क्वीन्स ॲवॉर्ड. लंडनमध्ये स्थायिक झालेले ज्येष्ठ मराठी उद्योजक आणि फ्रिशमन अँड प्रभू कंपनीचे भागीदार सुधाकर प्रभू यांचा हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. मराठी उद्योजकाला हा पुरस्कार मिळण्याचा दुर्मिळ योग जुळून आला तेव्हा फ्रिशमन ही मूळ कंपनी तसेच राणी एलिझाबेथ हे दोघेही आपले ऐंशीवे वर्ष साजरे करत होते!